# भामरागड वन्यजीव अभयारण्य



महाराष्ट्राच्या विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यात असलेल्या या अभयारण्याचे एकूण क्षेत्रफळ १०४.३८ चौरस किलोमीटर आहे. या अभयारण्याचे बरेचसे क्षेत्र घनदाट जंगलाचे आहे, तर काही ठिकाणी गवताळ परिसंस्था दिसून येते. अभयारण्यातून पार्लोकोटा आणि पामलगौतम नद्या वाहतात ज्या इथल्या स्थानिक गोंड आणि माडिया जातींच्या आदिवासी बांधवांसाठी पाण्याचा प्रमुख स्त्रोत आहेत. वन विभाग अभयारण्यातील लोकांना रोजगाराची पर्यायी साधने उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहे. जवळच कर्मयोगी बाबा आमटे यांचा हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्प आहे.



मुंगुस







साग



पांढऱ्या छातीचा धीवर



चितळ

## जैवविविधता :

भामरागड वन्यजीव अभयारण्य हे दक्षिणी उष्णकटिबंधीय कोरडे पानझडी जंगल आहे. साग हा येथे सर्वसामान्यपणे आढळून येतो. अभयारण्यातून आजतागायत २४५ प्रजातींच्या वनस्पतींची नोंद करण्यात आलेली आहे. ऐन, अर्जुन, बेहडा, बीजा, बेल, शिसम, तेंदू, हिरडा, कुसुम, जांभुळ, आंबा, हळदू, कदंब इत्यादी प्रमुख वृक्षप्रजाती अभयारण्यात आढळतात. हे अभयारण्य पूर्वी शिकारीसाठी राखीव क्षेत्र म्हणून ओळखले जात होते. अभयारण्य घोषित झाल्यापासून हळूहळू इथल्या वन्यप्राण्यांची संख्या स्थिर आहे. सांबर, चितळ, काळवीट आणि नीलगाय यांसह रानकुत्री, रानडुक्कर इत्यादी सस्तन प्राणी अभयारण्यात दिसून येतात.



नीलगाय





**कसे पोहचाल :**
**जवळचे विमानतळ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानतळ, नागपूर – ३७० किमी.
**जवळचे रेल्वेस्टेशन :** बल्लारपूर रेल्वेस्टेशन – १९७ किमी.
**रस्त्याने :** आहेरी १०२ किमी., बल्लारपूर आणि चंद्रपूर २१२ किमी.